नि.क्र.२८

साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सामनेवाली तर्फे श्री. ए. ए. शेख यांचेमार्फत –

३१. हे म्हणणे खरे आहे की, मी सध्या पावशी येथे रहातो. हे म्हणणे खरे आहे की, माझा व अर्जदाराचा विवाह एकमेकांच्या पसंतीने झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील ॲकाऊटंट म्हणून जिल्हा परिषदेत नोकरीस होते. आम्ही एकूण पाच भाऊ आहोत व आम्हांला दोन बहिणी आहेत. मी आईसोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी रिक्षा चालवतो. हे म्हणणे खरे आहे की, मी गरजुंना कर्ज मिळवून देण्यासाठी मदत करतो. हे म्हणणे खरे आहे की, आमची पावशी गावात समाईक जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, पावशी गावात माझी काजू फॅक्टरी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या फॅक्टरीतून माझे महिना दिड ते दोन लाख रुपये उत्पन्न मिळत असे. साक्षीदार सांगतो की, मशिनरी होती, पण त्या फॅक्टरीत कधी प्रक्रिया झाली नाही. सदरच्या मशिनरी तीन लाख रुपये किंमतीच्या होत्या.

३२. हे म्हणणे खरे आहे की, रिक्षा व्यवसायातून मी महिना चाळीस ते पन्नास हजार रुपये कमवतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारला माझेपासून हंसीका नावाची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, हंसीकाला लागणारा सर्व खर्च अर्जदारच करत असे. हंसीका सध्या कोठे आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती कोठे राहते, काय करते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सध्या अर्जदारच हंसीकाचा सांभाळ करते व तिचा सर्व खर्च तीच करते. हे म्हणणे खरे नाही की, अर्ज दाखल केल्यापासून मी हंसीकाला भेटण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार व मुलीची जबाबदारी झटकलेली आहे.

३३. स्वरा लक्ष्मण पावसकर ही माझे ओळखीची नाही. हे म्हणणे खरे नाही की,बाबत कुडाळ पोलीस मी व स्वरा कुडाळ वेंगुर्ला रस्त्यावर अश्लील चाळे करताना आढळल्याबाबत कुडाळ पोलीस ठाण्यात गुरनं.१३/२०१७ दाखल झाला होता.

प्रश्न – त्या फिर्यादीनुसार तुमच्यावर कुडाळ न्यायालयात समरी क्रिमीनल केस क्र.२१६/२०१७ दाखल झाला व त्यात तुम्हाला दंड झाला ?

उत्तर – मला दंड झाला पण कशाबददल झाला हे मला माहिती नाही.

**३४.** हे म्हणणे खरे नाही की, माझे वरील वर्तनामुळे व न्यायालयाने दंड ठोठावल्यामुळे माझे पत्नीची ती काम करीत असलेल्या पोलीस खात्यात बदनामी झाली.

**३५.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४/१२/२०२० रोजी रात्री १०.०० वाजता मी अर्जदार राहत असलेल्या भाडयाच्या रुममध्ये गेलो व मोठमोठयाने ओरडून ''तुझे बाहेरच्या पुरुषासोबत संबंध आहेत, तु मला चार लाख रुपये कर्ज काढून दे नाहीतर कोणाकडूनही घेवून दे, नाहीतर मी आत्महत्या करणार'' असे म्हणालो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने त्याबाबत माझेविरुध्द सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाण्यात गुरनं.९८/२०२० दाखल केला.

**३६.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/१२/२०२० रोजी मी अर्जदारच्या रुमवर गेलो व तिचे परपुरुषांशी संबंध आहेत, तू बाहेर डुयटी कशी करते ते बघतो, असे ओरोडलो व धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, तिने २७ तारखेला माझे विरुध्द पोलीसात तक्रार दिली.

प्रश्न – अर्जदार ही दिनाक ०८/०८/२०१५ रोजी कलेक्टर कॉलनी, ओरोस येथे भाडयाने रुम घेवून रहाण्यास गेली ?

उत्तर – ती तेथे रहाण्यास गेली, परंतू मला त्याची तारीख आठवत नाही.

**३७.** हे म्हणणे खरे नाही की, मला अर्जदाराला प्रत्यक्ष भेटायला न मिळाल्याने मी तिला फोनवरुन त्रास व धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माझेसोबत राहत असताना मी तिचा पगार माझेकडे ठेवायचो व खर्च करायचो. हे म्हणणे खरे नाही की, तिच्याच पगाराचे पैसे मिळवण्याकरीता तिला माझेकडे विनवणी करावी लागत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे चैनीकरीता

व मौजमस्तीकरीता तिचे एटीएम कार्ड वापरायचो. हे म्हणणे खरे नाही की, मी तिच्या कामाच्या ठिकाणी जाऊन तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे.

३८. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार तिच्या वडिलांच्या जागी अनुकंपातत्वावर नोकरीस लागली. हे म्हणणे खरे नाही की, मी तिला बोलून दाखविले की, मी तिच्याशी तिच्या पगारासाठी नोकरी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला जुगार व मटक्याचा नाद होता. हे म्हणणे खरे नाही की, मला जुगार व मटक्याचा नाद असल्याने मी माझे गृह कर्ज व वैयक्तीक कर्जाचे हप्ते अर्जदाराच्या पैशातूनच भरायचो. हे म्हणणे खरे नाही की, माझे कर्जाचे हप्ते अर्जदार भरायची. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचा सर्व धर्म समभाव या तत्वावर प्रचंड विश्वास असून, ती मुल्ला मौलवी यांची असीम भक्त आहे, त्यांचे तन, मन, धन अर्पूण त्यांची अहोरात्र सेवा करण्यात ती मग्न असते व माझेकडे व मुलीकडे लक्ष नसते याबाबतचा वेगळा पुरावा मी अदयाप दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार सोडून गेल्याने मला डिप्रेशन सारखे मानसिक जडल्याबाबतचा पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने मला तायशेटे वकीला मार्फत दिनांक २७/१२/२०२० रोजी नोटीस पाठविले होती. हे म्हणणे खरे नाही की, ती नोटीस मिळाल्यानंतर मी तिच्याशी संपर्क केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी संपर्क न केल्याने तिला माझे विरुध्द या न्यायालयात घटस्पोटाकरीता अर्ज दाखल करावा लागला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या अर्जाची नोटीस मला मिळाले नंतर मी अर्जदार हिला शिवीगाळ केली व चापटाने मारले.

प्रश्न – तुम्ही मारहाण केल्याबाबत तिने दिनांक २२/०१/२०२१ रोजी तुमच्या विरुध्द सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाण्यात भादवीकलम ३२३,५०४ व ५०६ अन्वये गुरनं.९/२०२१ दाखल केला ?

उत्तर – तिने गुन्हा दाखल केला पण कशासाठी केला हे मला माहिती नाही.

**३९.** हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिचा शारीरीक व मानसकि छळ केल्याने तिला हा अर्ज करणे भाग पडले. हे म्हणणे खरे नाही की, अर्ज दाखल करते वेळेस हंसीकाच्या डॉन बॉस्को या शाळेत शिकण्यासाठी म्हणून ओरोस येथे राहण्यासाठी दरमहा पाच हजार रुपये भाडयाची आवश्यकता होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदारला दिलेल्या शारीरीक व मानसिक छळामुळे मी तिला पाच लाख रुपये नुकसान भरपाई देण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार व मुलीच्या दैनंदिन व इतर खर्चासाठी दरमहा रुपये ३५ हजार देण्यास बांधील आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार व आमच्या मुलीला शारीरीक मानसिक त्रास दिल्याने अर्जदारला हा अर्ज करणे भाग पडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – पूर्ण**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.02.02 18:56:59 +0530

( ए.जी.देशिंगकर )

दिनांक – ०२/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
सिंधुदुर्ग–ओरोस.